अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.८२/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ ७८७९ दि.०७/१०/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/८२/२०२४

श्री.अविनाश माणिकराव जगताप
स.नं.२४/७/६ तथास्तु, आंबेगाव पठार
आंबेगाव बु., पुणे -४११०४६

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.अविनाश माणिकराव जगताप, स.नं.२४/७/६ तथास्तु, आंबेगाव पठार, आंबेगाव बु., पुणे - ४११०४६ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/६/२०२४ (आ.क्र.४८८५, दि.२७/६/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३९८० दि.१९/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २७/६/२०२४ | २७/६/२०२४ | २६/७/२०२४ | १९/७/२०२४ | ० |

माहिती अधिकार अर्जात मागितलेली माहिती अवलोकनासाठी बोलविले मात्र माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन दि.९/९/२०२४ रोजी (आ.क्र.१०६९५ दि.९/९/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ९/९/२०२४ | ९/९/२०२४ | १८/८/२०२४ | नाही | उत्तर दिल्यापासून २३ दिवस विलंब |

सदर अपिलाची सुनावणी दि.१/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/७२०६, दि.२४/९/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. काही प्रशासकीय कारणामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. सुनावणी **त्याच दिवशी (१/१०/२०२४)** दुपारी १२.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/७५३०, दि.३०/९/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

माहिती अधिकार अर्जात मागितलेली माहिती अवलोकनासाठी बोलविले मात्र माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन दि.९/९/२०२४ रोजी (आ.क्र.१०६९५ दि.९/९/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे. अपिल अर्ज विलंबाने सादर केला असल्याने अपिलार्थी यांनी माहिती अवलोकन करुन न मिळाल्याने अपिल अर्ज करण्यास विलंब झालेला असल्याचे दि.१/१०/२०२४ रोजी (आ.क्र.१२२५६ दि.१/१०/२०२४) अर्ज दाखल केला आहे

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/६/२०२४ (आ.क्र.४८८५, दि.२७/६/२०२४) रोजी दाखल केला आहे. सन २०१७ साली ग्रामपंचायत समाविष्ट कर्मचारी सेवेत घेताना मा.विधी समिती यांनी त्यांचे अहवालाबाबत परिशिष्ट 'ब' यादीतील कर्मचाऱ्यांचे रुजू दि. पुणे मनपाने तत्कालीन जिल्हा परिषदेकडून भरती करत असताना वरिष्ठ कार्यालयाची परवानगीबाबत सूचनापत्र, नमुना २१ व लावलेले निकष याबाबतचे दस्तऐवज याबाबत माहिती अधिकार अर्जात मागितली आहे. सदर माहिती जा.क्र.जमाअ/आस्था/३९८० दि.१९/७/२०२४ रोजी अवलोकनासाठी बोलविण्यात आले होते.

अपिलार्थी यांनी दि.२४/७/२०२४ रोजी माहितीचे अवलोकन करुन माहिती उपलब्ध नव्हते असे नमूद करुन दि.२४/७/२०२४ (आ.क्र.७००० दि.२४/७/२०२४) रोजी पत्रात नमूद केले आहे.

सन २०१७ च्या समाविष्ट गावांच्या भरतीबाबतचे दस्त मागविण्यात आले आहेत. त्यासाठी दि.२४/७/२०२४ रोजी माहितीचे अवलोकन करण्यात आले आहे मात्र माहिती अप्राप्त असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

सन २०१७ मध्ये समाविष्ट गावांच्या कर्मचारी नियुक्तीबाबतचे अभिलेखे अपिलार्थी यांना दि.२४/७/२०२४ रोजी अवलोकनार्थ देण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

सन २०१७ ची समविष्ट गावांची माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. माहितीचे अवलोकन होवून अपिल अर्ज दाखल करणेस विलंब झाल्याने अपिलार्थी यांचा अर्ज करण्यात झालेला विलंब मान्य करण्यात आला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक माहिती फेर तपासणी करुन उपलब्ध करुन देण्यात यावी, असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी अभिलेख्यांची फेर तपासणी करुन माहिती अपिलार्थी यांना अवलोकनार्थ देवून उपलब्ध माहिती विनामूल्य आदेश प्राप्तीपासून ३० दिवसात देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.८२/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
7-10-24.

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.